वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी.

क्र.अेपीबी-१/से.ज्ये.

दिनांक :१३.९.२०१९

# परिपत्रक

**विषय : वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषि) या संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक १.१.२०१९ रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत.**

वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषि) या संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक १.१.२०१९ रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठता सूची यासोबत संलग्न करण्यात येत आहे.

वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषि) या संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक १.१.२०१९ रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठता सूची या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात येत असून संबंधित कर्मचा-यांचे याबाबत कांही आक्षेप/तक्रारी असल्यास, त्यांची बाजू मांडण्यासाठी जेष्ठता सूची प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत, संबंधितांनी त्यांचे आक्षेप/तक्रारी लेखी स्वरुपात योग्य त्या माध्यमाद्वारे सादर करावेत.

संबंधितांचे आक्षेप/तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, त्या तपासण्यात येवून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन, अंतिम सेवा जेष्ठता सूची प्रसारित करण्यात येईल.

सदर तात्पुरती सेवा जेष्ठता सूची महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम ४१ अन्वये सरळसेवा व पदोन्नतीचे प्रमाण ठरविल्यानुसार व कार्यकारी परिषदेने मंजूर केलेल्या सेवा जेष्ठता नियमावली १९८७-८८ च्या अधिन राहून तयार करण्यात आलेली आहे.

सर्व कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर तात्पुरती सेवा जेष्ठता सूची आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व-संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी आणि या सूचीची नोंद घेतल्याबाबत त्यांची स्वाक्षरी अधिसूचनेवर घेण्यात यावी आणि या बाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

कुलसचिव